Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- XI ISSUE- III MARCH 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

# उच्च शिक्षणामध्ये नॅकची भूमिका : एक अभ्यास

**डॉ. सुधीर वरबडे भूमकर**
अभिनव अध्यापक महाविद्यालय, लातूर

**प्रस्तावना :-**

उच्च शिक्षण संस्थाना तसेच विद्यापीठांना नॅकची मान्यता गरजेची आहे. नॅक मान्यता घेतली नाही, तर महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठे शासनाच्या अनेक योजनांपासून वंचित राहतात. म्हणूनच नॅक गरजेचे आहे. नॅकमुळे उच्च शिक्षण संस्था महाविद्यालये यांचा दर्जा सुधारला जातो. त्यामध्ये काळानुरूप बदल केले जातात. सुधारणा केली जाते. विद्यार्थी, प्राध्यापकांचा दर्जा सुधारण्यास मदत होते. म्हणूनच नॅककडून, मुल्यांकन करून घेणे काळाची गरज आहे. नॅकच्या ग्रेडींग सिस्टममुळे महाविद्यालये, उच्च शिक्षण संस्था यामधील भौतिक सुविधा, विद्यार्थी, प्राध्यापकांचा स्तर सुधारण्यामध्ये मदत होते. मात्र अलिकडच्या काळात नॅकचे मुल्यांकन संशयाच्या जाळयात अडकल्याचे दिसते. तरीही नॅक मूल्यांकन ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामुळे प्राध्यापक, शिक्षक, संस्था अपडेट राहण्यास मदत होते. नवीन ज्ञान, माहिती तंत्रज्ञानामुळे विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यामध्ये सुधारणा करता येते.

**नॅकचे स्वरूप व ओळख :-**

नॅकची स्थापना 1994 ला झाली मात्र त्याची सुरूवात 1991 पासून झालेली दिसते. NAAC नॅक नॅशनल असेसमेंट ॲक्रिडिटेशन काऊन्सील (National Assesment and Accredtation Council) म्हणजेच राष्ट्रीय मुल्यांकन (National Assesment and Accredtation Council) आणि मान्यता परिषद ही युजीसीच्या अखत्यारित कार्य करणारी शासकीय संस्था आहे. ही एक महाविद्यालये तसेच उच्च शिक्षण संस्थाचे मुल्यांकन करणारी संस्था आहे. 350 पेक्षा जास्त विद्यापीठे 7000 पेक्षा जास्त महाविद्यालये यांचे मुल्यांकन नॅक द्वारे केले जाते. म्हणूनच सर्वच उच्च शिक्षण संस्थांना नॅकची मान्यता गरजेची तर आहेच मात्र शासनाने ते सक्तीचे केलेले आहे. केवळ मुल्यांकन न करता वेळोवेळी नॅक द्वारे पूनर्मुल्यांकन देखील करणे गरजेचे आहे.

नॅक कडे रजिस्ट्रेशन करणे तसेच दिलेल्या कालावधीत अहवाल तयार करणे व अहवालानंतर नॅकच्या कमेटीद्वारे मूल्यांकन करून घेणे गरजेचे असते. ही संस्था आपल्या निकषानुसार ग्रेडींग देत असते. म्हणजेच मूल्यांकन आणि मान्यता यांच्या माध्यमातून कोणत्याही संस्थेचा, महाविद्यालयाचा, विद्यापीठाचा दर्जा पाहाता येतो. नॅकमध्ये S.S.R रिपोर्ट हा अतिशय महत्वाचा भाग आहे. त्यावरच आपल्या संस्थेचा दर्जा किंवा ग्रेड निश्चित होत असतो. म्हणून हा रिपोर्ट अतिशय काळजीपूर्वक तयार करणे गरजेचे असते.

**नॅकची पार्श्वभूमी -**

युर्निव्हसिटी ग्रँड कमीशनच्या अखत्यारितील कार्य करणारी नॅक म्हणजेच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद 1994 ला स्थापना झाल्यानंतर प्रांरभीच्या काळी या परिषदेचे कार्य धिम्यागतीने चालू होते. मात्र उच्च शिक्षण संस्था आणि विद्यापीठे यांचा दर्जा सुधारावयाचा असेल तर, नॅक ला सामोरे जाणे आवश्यक आहे. तसेच यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेता येणार आहे आणि संस्थेचा महाविद्यालयाचा विकास योग्य गतीने करता येणार आहे हे स्पष्ट झाल्यानंतर नॅकची प्रगती झपाट्याने झाल्याचे दिसते.

नॅकचे पहिले अध्यक्ष प्राध्यापक राम रेड्डी होते तर पहिले संचालक अरूण निगवेकर होते. नॅकेचे महाराष्ट्रातील पहिले अध्यक्ष प्राध्यापक राम ताकवले तर दुसरे अध्यक्ष डॉ.भूषण पटवर्धन हे होते. नॅक तिच्या जनरल कौन्सील आणि कार्यकारी समिती द्वारे कार्य करते. नॅकचे मुख्य कार्यालय बेंगलूर येथे आहे. नॅकच्या धर्तीवर शाळांचेही ग्रेडेशन करण्याची गरज वर्तविली जाते आहे. महाराष्ट्र राज्य नॅक मूल्यांकनात आघाडीवर आहे. नॅकचा प्रभाव अलिकडच्या काळात उच्च शिक्षणामध्ये वाढत असतानाच नॅक

मूल्यांकनाची नवी पध्दती जून 2024 पासून अमलात येणार आहे अशीही माहिती पुढे येत आहे.

**नॅकची मुख्य ध्येय –**

उच्च शिक्षणामध्ये महाविद्यालये, उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये अध्यापन, शिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहीत करण्यासाठी शैक्षणिक वातावरणाला प्रोत्साहन देणे.

उच्च शैक्षणिक संस्था किंवा युनिट तसेच विशिष्ट शैक्षणिक कार्यक्रमाचे, प्रकल्पाचे मूल्यांकन, मापन आणि मान्यता यांची व्यवस्था करणे.

उच्च शिक्षणामध्ये स्वयंमूल्यमापना सारख्या नव कल्पनांना प्रोत्साहीत करण्यासाठी दर्जेदार संशोधन, अभ्यास आणि प्रशिक्षण कार्यक्रम घेणे.

या ध्येयाच्या पुर्ततेसाठी नॅक ही परिषद कार्यरत आहे. यातून शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थी, प्राध्यापक यांची गुणवत्ता सुधारणे शैक्षणिक संस्थेचे मानांकन सुधारणे अशा ध्येयपुर्तीसाठी नॅक कार्यरत आहे.

**नॅकची प्रक्रिया –**

साधारणपणे 20 व्या शतकातील शेवटच्या दशकामध्ये नॅक प्रक्रिया सुरू झाली. आज सर्वत्र नॅकचे महत्व वाढलेले आहे. नव्हे नॅकच्या मूल्यांकनावरच उच्च शिक्षण संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे यांचे अस्तित्व अवलंबून आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. विशेष करून अनुदानित असलेल्या उच्च शिक्षण संस्था, महाविद्यालये यांना तर अनिवार्यच आहे. अनुदानित महाविद्यालयाबरोबरच विनाअनुदानित शासकीय मान्यता असलेल्या महाविद्यालयास देखील नॅक मूल्यांकन करून घेणे गरजेचे आहे.

नॅकमध्ये वेगवेगळे क्रायटेरियाज आहेत. हे क्रायटेरियाज काळानुरूप बदलत गेलेले आहेत. यामध्ये टिचिंग, लर्निंग, इव्हॅल्युवेशन प्रकीया, संस्थेतील, महाविद्यालयातील भौतिक सुविधा म्हणजेच इमारत विविध वर्गखोल्या, ग्रंथालय डिपार्टमेंट, ग्राऊंड यांचा समावेश होतो. विद्यार्थ्यांचा विविध ॲक्टीविटीज मध्ये सहभाग, अभ्यासक्रम त्याचे नियोजन व अंमलबजावणी हेही महत्वाचे आहे. गतकळातील विद्यार्थी सध्या काय करतात. कोणत्या पदावर आहेत. या संबंधीही माहिती गरजेची असते. महाविद्यालयातील विविध विभागानुसार माहिती अभिप्रेत असते. यामध्ये उपलब्ध साधनसामुग्री, मनुष्यबळ, महाविद्यालयात राबवले जाणारे विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक उपक्रम अशा प्रकारे वरील सर्व बाबींच्या गुणवत्तेवरच महाविद्यालयाची गुणवत्ता अवलंबून असते. यामध्ये एस.एस.आर रिपोर्ट हा महत्वपूर्ण भाग समजला जातो. प्रत्येक निकषानुसार गुण ठरवलेले असतात. आपल्याकडे विद्यार्थ्यांसाठी, प्राध्यापकांसाठी कोणकोणत्या सुविधा दिल्या जातात. याचीही माहिती असते. म्हणजेच समाजासाठी आपली संस्था किती उपयुक्त आहे. हेही महत्वाचे असते. विद्यार्थी, संस्था त्यांची गुणवत्ता त्यांचा निकाल, संशोधन कार्य, प्राध्यापकांची गुणवत्ता, विविध प्रकल्प इ. ची माहिती आवश्यक असते. याबरोबरच गतकळातील विद्यार्थ्यांवर देखील फोकस टाकला जातो.

**नॅकची उच्च शिक्षणातील भूमिका –**

आजच्या स्थितीत 350 पेक्षा जास्त विद्यापीठे तसेच 7000पेक्षा जास्त उच्च शिक्षणातील महाविद्यालये नॅककडून मूल्यांकन करून घेतात. महाराष्ट्रात तर नॅक मूल्यांकनाचे प्रमाण देशात इतर राज्याच्या तुलनेत सर्वाधिक आहे. या वरूनच उच्च शिक्षणामध्ये नॅकचा परिणाम मोठया प्रमाणात दिसून येतो. नॅक मूल्यांकन केल्यामुळे उच्च शिक्षणातील UGCच्या इतर ज्या विविध योजना आहेत त्यांचा फायदा उच्च शिक्षणातील संस्था, महाविद्यालये, विद्यापीठे यांना घेता येतो. यातून देखील नॅकचे महत्व वाढतच आहे.

केंद्र सरकार तसेच राज्य सरकारच्या विविध आर्थिक बाबींचा मोठया प्रमाणात फायदा नॅक केल्यामुळे घेता येतो. जसे- वस्तीगृह, इन्डोअर स्टेडियम, आऊट डोअर स्टेडियम यांचा विकास करणे, लॅब, ग्रंथालय, वर्गखोल्या, तंत्रविज्ञान इ.चा वापर करून घेणे म्हणजेच नॅकचा संस्थेला, महाविद्यालयास आर्थिक मोबदला मिळवता येते.

शिक्षण हा राष्ट्रीय विकासातील एक महत्वाचा स्तंभ आह. हा स्तंभ विकसित करण्यामध्ये नॅकची भूमिका महत्वपूर्ण आहे आणि म्हणूनच उच्च शिक्षणामध्ये नॅकचे योगदान महत्वपूर्ण ठरते.

उच्च शिक्षणामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, तंत्रविज्ञानाचे महत्व अनिवार्य आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरासाठी नॅक प्रेरक ठरते.

अद्यावत शिक्षण प्रक्रिया, शैक्षणिक धोरणे, शिक्षण पध्दती यांच्यासाठी नॅक मूल्यांकन महत्वाचे आहे.

आधुनिक शिक्षण प्रवाह, विविध देशातील शिक्षण, आधुनिक काळात झालेले बदल आत्मसात करण्यासाठी नॅक आवश्यक आहे.

उच्च शिक्षणात आवश्यक प्रगती, बदल व उपयोजनात्मक कौशल्यात्मक प्रगतीसाठी, उच्च शिक्षणासाठी नॅक प्रभावी ठरू शकते.

उच्च शिक्षणामध्ये व्यवहारिक ज्ञानाच्या उपयोगासाठी व दैनंदीन गरजांच्या पुर्ततेसाठी नॅक आवश्यक वाटते. त्यातून विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना एक नवी दिशा मिळते.

नॅकच्या मूल्यांकनातून उच्च शिक्षण संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये यांचे आंतरिक तसेच बाह्य स्वरूप बदलत आहे. म्हणूनच उच्च शिक्षणामध्ये नॅकचे महत्व वाढत आहे. म्हणजेच उच्च शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, प्राध्यापक, विद्यार्थी यांच्या आंतरिक बाह्य गुणात्मक बदलास नॅक महत्वाचा भाग आहे.

**समारोप –**

एकूणच नॅकच्या माध्यमातन यु.जी.सी. तसेच शासनाचा अंकुश उच्च शिक्षणा संस्थावर राहत असल्याचे दिसते. नॅकमुळे महाविद्यालय, प्राध्यपापक, विद्यार्थी हे एकप्रकारे काळानुसार स्वत:मध्ये बदल करण्याची क्षमता ठेवतात. नवीन बदल, नवीन ज्ञान, नवीन माहिती, आधुनिक काळातील गरजा स्विकारण्याची क्षमता उच्च शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यामध्ये येते. जुन्या बरोबरच नव्यांचा स्विकार करण्याची तयारी यामुळे होताना दिसते. सातत्याने मूल्यांकन होत असल्याने सतत कार्य करण्याची तत्परता राहते. नवे ज्ञान, नवी माहिती, नवीन बदल स्विकारण्याची तयारी दिसते. अंतर्गत तसेच बाह्य सुधारणा, बदल उच्च शिक्षणामध्ये घडून येतात. विद्यार्थी, प्राध्यापक, विद्यार्थी अपडेट राहण्यास मदत होते. अलिकडच्या काळात नॅक विषयी विविध उलट सुलट बातम्या येत असल्यातरी उच्च शिक्षणातील अपेक्षित बदलास, अंतर्गत-बाह्य गुणात्मकतेसाठी नॅक सारख्या परिषदेची उच्च शिक्षणामध्ये नितांत गरज असल्याचेच दिसते. महाविद्यालयीन, गुणवत्तेवर, सुधारणात्मक बदलामध्ये नॅकचा सहभाग महत्वाचाच ठरतो. म्हणूनच उच्च शिक्षणाचे मुल्यांकन करणारी ही परिषद असणे काळाचीच गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची –**

1) http://naac.gov.in
2) NAAC for Quality and Excellence in High Education in India. Dr. S.R.Pearl, Dr. Monika Kannam
3) New NAAC Guideline, Edited by Pradipta Mukherjee, Swarup Sana.